# बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे ऑगस्ट २०१८

## गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–०४, गु.अ.वि; मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | गु.प्र.शा;गुरक्र.४७/२०१८ कलम ३६३,३६४(अ),३२८,३४३,३२४,५०६,३४ भादवि सह ३७(१) मपोका. (विनोबा भावे नगर पोलीस ठाणे गुरक्र.२२३/१८) |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक ०३/०८/२०१८ रोजी २१.३० वा. चे सुमारास |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | खो.क्र.१०३,बिल्डींग क्र.६, सी विंग,पहिला मजला, एचडीआयएल, कुर्ला (प),मुंबई. |
| ४ | **फिर्यादी** | श्री. आलीम नईम खान वय ४५ वर्षे. |
| ५ | **बळीत** | फिर्यादी यांचा १३ वर्षीय अल्पवयीन मुलगा |
| ६ | **गुन्हयातील चोरीस गेलेली मालमत्ता** | –– |
| ७ | **हस्तगत मालमत्ता** | गुन्हयात वापरलेल्या दोन ऑटो रिक्षा, कॉरेक्स औषधाची बाटली व माझा शितपेयाची बाटली, गुन्हयात वापरलेला चाकू, |
| ८ | **आरोपी अटक** | १) सुल्तान रियाजउल्ला खान वय २६ वर्षे,<br>२) जहांगिर हैदरअली शेख वय २८ वर्षे,<br>३) गुरफान मोहम्मद आरीफ शेख वय २६ वर्षे<br>४) विल्यम उर्फ सोहेल अहमद सिध्दीकी वय ३३ वर्षे,<br>**अटक दिनांक ०६/०८/१८ रोजी**<br>महिला आरोपी क्र. ५) शबीना अशरफ खान वय २७ वर्षे<br>**अटक दिनांक ०७/०८/१८ रोजी** |

गु.प्र.शा;गुरक्र.४७/२०१८ कलम ३६३,३६४(अ),३२८,३४३,३२४,५०६,३४ भादवि सह ३७(१) मपोका.(विनोबा भावे नगर पोलीस ठाणे गुरक्र.२२३/१८) या गुन्हयात दिनांक ०३/०८/२०१८ रोजी २१.३० वा. चे सुमारास खो.क्र.१०३,बिल्डींग क्र.६, सी विंग,पहिला मजला, एचडीआयएल, कुर्ला (प),मुंबई. यातील फिर्यादी हे कामावर जात असताना त्यांचा १३ वर्षीय अल्पवयीन मुलगा त्यांचे सोबत खाली आला व त्याने आईस्क्रीम मागीतली. त्यास फिर्यादी यांनी नकार दिल्याने तो रागात त्याची काकी श्रीमती सकीना हिचेसोबत जात असताना '' मेरा हात छोडो, मै अकेला जाऊंगा '' असे बोलला व काकी निघुन गेल्या. त्यानंतर बराच वेळ नमुद मुलगा घरी परत न आल्याने फिर्यादी व त्याचे नातेवाईकांनी त्याचा सर्वत्र शोध घेतला असता तो कोठेही मिळुन आला नाही म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक ०४/०८/२०१८ रोजी विनोबा भावेनगर पोलीस ठाणे गुरक्र.२२३/१८ कलम ३६३ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–०४, गु.अ.वि; मुंबई च्या पथकाने नमुद गुन्हयाची माहिती मिळताच गुन्हयाचा तपास सुरू केला. सदर पथकाने फिर्यादी यांचेकडून संपुर्ण घटनाक्रम समजुन घेतला. सदर पथकाने प्राप्त खात्रीलायक गोपनिय माहितीच्या अनुषंगाने दिनांक ०५/०८/२०१८ रोजी इसम नामे सुल्तान रियाजउल्ला खान वय २६ वर्षे, यास त्याचे राहते घर आदर्श नगर, भारत नगर मस्जिद, रोड नं १३, बैगन वाडी, गोवंडी, मुंबई ४३ येथुन शिताफीने ताब्यात घेवून त्याच्याकडे कसुन चौकशी करण्यात आली. सदर पथकाने त्याचेकडे चौकशीअंती त्यास घरी जावू देण्यात आले होते. सदर पथकाने पुन्हा दिनांक ०६/०८/२०१८ रोजी तोच इसम नामे सुल्तान यास कक्ष कार्यालयात बोलावून त्याच्याकडे पुन्हा सातत्यपुर्ण चौकशी करता, त्याने त्याचे इतर साथीदार नामे १) जहांगिर शेख, २) विल्यम उर्फ सोहेल सिध्दीकी, ३) गुफरान शेख, ४) सुलतान, व ५) शबीना खान, यांचे मदतीने अपहृत मुलाचे अपहरणाचा कट रचला. कटाचे अनुसार त्यांनी दिनांक ०३/०८/२०१८ रोजी सुमारे २१.३० वा मुलाचे राहते घराचे खालून त्यास रिक्षामध्ये जबरदस्ती नेवून अपहरण केल्याची कबुली दिली. तसेच आरोपीतांनी अपहृत मुलास म्हाडा शिवाजी नगर येथील त्याचे मोटार कार खरेदी/विक्रीचे ऑफिसमध्ये डांबुन ठेवल्याचेही सांगितले.

सदर पथकाने नमुद गुन्हयाचे तपासाबाबत वरिष्ठांना सविस्तर माहिती दिली असता, त्यांनी नमुद गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन कार्यालयीन आदेशान्वये नमुद गुन्हा गुन्हे प्रकटीकरण शाखेकडे वर्ग करून गुप्रशा; गु.र.क्र

४७/१८, कलम ३६३ भादवि अन्वये नोंद करून कक्ष–४, गु.प्र.शा, गु.अ.वि, मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आला. सदरची बाब अत्यंत गंभीर असल्याने व अपहृत मुलाचे जीवास धोका असल्याचे शक्यतेने सदर पथकाने इसम नामे सुल्तान याचे सह तात्काळ ' सुल्तान ऑटो मोटर्स प्रा.लि, म्हाडा, शिवाजी नगर, मुंबई ' या ठिकाणी जावून पाहणी केली असता, सदरचे कार्यालयाचे शटरला बाहेरून कुलूप असल्याचे आढळले. सदर पथकाने लागलीच दोन लायक पंचाना पाचारण करून त्यांचे समक्ष सुल्तान याच्याकडी चावीने नमुद ऑफिसचे शटर उघडले असता, आत मध्ये फिर्यादी यांचा १३ वर्षीय अपहृत मुलगा व सुल्तान याचा नमुद गुन्हयातील एक साथीदार नामे जहांगिर शेख तेथे मिळुन आले. सदर पथकाने क्षणचाही विलंब न करता, अपहृत बालकास सुरक्षीततेच्या कारणास्तव तसेच आ.क्र. २) जहांगिर हैदरअली शेख वय २८ वर्षे यास चौकशीकामी ताब्यात घेतले. सदर पथकाने आ.क्र.१) सुल्तान रियाजउल्ला खान याचेकडे अन्य साथीदारांबाबत कसुन सखोल चौकशी करता, त्याने सांगीतलेल्या पत्त्यावर जावून त्याचे अन्य दोन साथीदार आ.क्र.३) गुरफान मोहम्मद आरीफ शेख वय २६ वर्षे, व ४) विल्यम उर्फ सोहेल अहमद सिध्दीकी वय ३३ वर्षे यांना त्यांचे राहते परीसरातुन ताब्यात घेण्यात आले. ताब्यातील चारही आरोपीतांकडे सदर पथकाने कौशल्यपुर्ण चौकशी करता त्यांनी सांगितले की, त्यांची परीचित महिला नामे शबीना हिला आर्थीक अडचण असल्यामुळे व फिर्यादी यांची आर्थिक परिस्थिती चांगली असल्याने, वरील नमुद चारही आरोपीतांनी फिर्यादी यांच्या मुलाचे अपहरण करून त्यांच्याकडुन खंडणीची मागणी करून त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली करता येईल असा कट रचला. त्या अनुषंगाने नमुद मुलाचे अपहरण केले असल्याचे कबुली दिली. त्यांनी नमुद गुन्हा केल्याची कबुली दिलेवरून त्यांना सदर गुन्हयात दिनांक ०६/०८/२०१८ रोजी रितसर अटक करण्यात आली.

तसेच नमुद गुन्हयाचे तपासा दरम्यान महिला नामे शबीना खान ही यातील फिर्यादी यांचे भावाची पत्नी असल्याचे निष्पन्न झालेवरून, फिर्यादी यांना महिला नामे शबीना खान हिस कक्ष कार्यालयात घेवुन येण्याबाबत कळविण्यात आले. त्याप्रमाणे नमुद महिला फिर्यादी यांचेसह कक्ष कार्यालयात तिचे पतीसह हजर झाली. सदर पथकाने महिला नामे शबीना अशरफ खान वय २७ वर्षे हिचेकडे नमुद गुन्हयांचे तपासाचे अनुषंगाने कसुन सखोल सातत्यपुर्ण चौकशी करता, तिचा सदर गुन्हयातील सक्रीय सहीभाग निष्पन्न झालेवरून तिस नमुद गुन्हयात दिनांक ०७/०८/२०१८ रोजी रितसर अटक करण्यात आली.

सदर पथकाने तपासा दरम्यान नमुद गुन्हयातील अपहृत मुलगा याची सायन रूग्णालय येथे वैद्यकिय तपासणी केली असता, नमुद अपहृत मुलाने त्याचे वैद्यकिय तपासणीच्या वेळी सायन रूग्णालय येथील डॉक्टरांकडे दिलेल्या जबाबात त्यास उपरोक्त अटक आरोपीतांनी त्याचे अपहरण केल्यानंतर गुंगीकारक पदार्थ दिले होते तसेच त्यास चाकुचा धाक दाखवून त्याच्या उजव्या हातावर जखम देखील केलेली होती. तसेच खंडणीच्या मागणी करीता अपहृत मुलाच्या वडीलांचा मोबाईल क्रमांकाची मागणी केली होती व अपहृत मुलाने त्याचे वडीलांचा मोबाईल अटक आरोपीतांना दिलेला होता असे सांगितले आहे. या सर्व बाबींमुळे नमुद गुन्हयात भादवि. कलम ३६४(अ),३२८,३४३,३२४,५०६,३४ सह कलम ३७(१) म.पो.का यांची वाढ करण्यात आलेली आहे.

गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–०४, मुंबई चे पथकाने कोणताही सबळ पुरावा उपलब्ध नसताना केवळ मानवी कौशल्याचा वापर करून फिर्यादी यांच्या मुलाचे अपहरण करून त्यांच्याकडुन खंडणीची मागणी करून त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली करता येईल असा कट रचून १३ वर्षीय अल्पवयीन मुलाचे गुंगीकारक पदार्थ पाजुन व त्यास चाकुचा धाक दाखवून अपहरण करणाऱ्या पाच आरोपीतांना अथक प्रयत्नाने अटक करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरच्या गंभीर व संवेदनशील गुन्हयाची कौशल्याने उकल केल्याने **मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना ऑगस्ट –२०१८ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोधाचे पारितोषिकाने सन्मानित केले आहे.

**गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–०४, मुंबई तपास पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार**

| अ.क्र. | पोलीस अधिकारी/अंमलदार नांव | अ.क्र. | पोलीस अधिकारी/अंमलदार नांव |
|---|---|---|---|
| ०१ | प्र.पो.नि. संदेश सदाशिव रेवले | ०५ | पोनाक्र.३२४०४/संभाजी नारायण साळुंखे |
| ०२ | सपोनि. विनोद विठ्ठल माळवे | ०६ | पोनाक्र.९६०६३३/अजय शंकर बल्लाळ |
| ०३ | पोहक्र.२५२९५/कृष्णा रामचंद्र नार्वेकर | ०७ | पोनाक्र.३०४८३/गंगाधर सोपान पिलवटे |
| ०४ | पोहक्र.२५८५६/उमेश रमेश शिरगांवकर | ०८ | पोनाक्र.९९०१६४/दिपक लक्ष्मण मांढरे |

--- ooo ---